**विषय :- सर्व अधिकारी व कर्मचारी दर सोमवार व शुक्रवार कार्यालयात उपस्थीत राहणे बाबत.**

**परिपत्रक**

सामान्य प्रशासन विभाग,जिल्हा परिषद वाशिम

परिपत्रक क्रमांक जाक्र/जिपवा/साप्रवि/आस्था-२/१९१८/२०१८

दिनांक ७८ एप्रील २०१८

जिल्हा परिषदेतील विविध विभागात तसेच पंचायत समिती स्तरावर केंद्र शासन व राज्य शासनाकडून राबविण्यात येणा-या योजनांचे अंमलबजावणी बाबत बरेच ग्रामस्थ तसेच मा.पदाधिकारी हे कार्यालयात कामकाजा करिता येतात परंतु अधिकारी कर्मचारी हे दौऱ्यावर असल्याने त्यांना ताटकळ बसावे लागते त्यामुळे कार्यालयीन कामकाजावर तसेच राबविण्यात येणाऱ्या योजनांचे कामकाजावर विपरीत परिणाम होत असल्याचे निदर्शनास आले आहे. तसेच कार्यालयीन अधिकारी व क्षेत्रीय कर्मचारी हे कार्यालयात उपस्थीत राहणे आवश्यक असतांना कार्यालयीन वेळेत कार्यालयात उपस्थीत राहत नसल्याचे आढळुन आले आहे.

करिता सर्व अधिकारी व क्षेत्रीय कर्मचारी यांनी दर सोमवार व शुक्रवार ला कार्यालयात उपस्थीत राहणे बंधनकारक करण्यात येत आहे. वरील दिवशी कोणत्याही परीस्थीतीत अधिकारी व कर्मचारी यांनी दौऱ्यावर जावु नये. त्यांनी दर सोमवार व शुक्रवार ला कार्यालयात उपस्थीत राहुन कार्यालयीन कामकाज करावे. वरील दिवशी वर्ग-१ व वर्ग-२ चे अधिकारी यांना दौऱ्यावर जाणे आवश्यक असल्यास त्यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी यांची पुर्व परवानगी व वर्ग-३ चे कर्मचारी यांना दौऱ्यावर जाणे आवश्यक असल्यास त्यांनी कार्यालय प्रमुखांची लेखी परवानगी घेवुन दौऱ्यावर जाणे बंधनकारक करण्यात येत आहे.

यापुढे वरील परीपत्रकाचे अमलबजावणी काटेकोर पणे करण्यात यावी. सदर प्रकरणी ज्या अधिकारी / कर्मचारी यांनी आदेशाची अवहेलना केल्यास सबंधिताविरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम १९७९ नियमानुसार व महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (शिस्त व अपिल ) नियम १९६४ नुसार शिस्तभंगाची कारवाई केली जाईल याची नोंद घ्यावी.

सदरच्या परिपत्रकाची तात्काळ अंमलबजावणी करण्यात यावी.

**(सौ. हर्षदा दि. देशमुख)**
**अध्यक्ष**
**जिल्हा परिषद वाशिम**

**(दीपक कुमार मीना)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद वाशिम**

प्रति,

१) मा.विभागीय आयुक्त अमरावती विभाग अमरावती यांना माहिती करिता सविनय सादर
२) अति.मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद वाशिम
३) प्रकल्प संचालक जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा वाशिम यांना माहिती व वरील प्रमाणे अमलबजावणी करीता.
४) खाते प्रमुख - - - - - - - - - - - - - - - -- - जि.प.वाशिम यांना माहिती व वरील प्रमाणे अमलबजावणीं करीता.
५) गटविकास अधिकारी पंचायत समिती - - - -- - - - - (सर्व) यांना माहिती व वरील प्रमाणे अमलबजावणी करीता.
६) कार्यालय प्रमुख - - - - - - - - - - -- - - - - - - - (सर्व) यांना माहिती व वरील प्रमाणे अमलबजावणी करीता.

**(सौ. हर्षदा दि. देशमुख)**
**अध्यक्ष**
**जिल्हा परिषद वाशिम**

**(दीपक कुमार मीना)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद वाशिम**